**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९१/२०२५**

**निशाणी क्र. ०७ खालील आदेश–**

**( दि. ०९.०१.२०२६ रोजी पारीत )**

प्रस्तुत अर्जाद्वारे फिर्यादी विनंती केली आहे की, यातील फिर्यादी यांनी या आरोपी विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्ट कलम १३८ प्रमाणे फिर्याद दाखल केलेली आहे. प्रस्तूत फिर्यादी मध्ये पॅरा नं. ६ मध्ये दि. ०८.०१.२०२४ असे चुकीचे टाईप झालेले आहे. त्याऐवजी दि. ०८.०१.२०२५ असे लिहीने आवश्यक होते. परंतू अनावधानाने व टाईपिंग मिस्टेकमुळे सदरची चुक झालेमुळे सदर फिर्यादीमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने सदरची दुरुस्ती करण्याची विनंती त्यांनी केली आहे. सदरच्या दुरूस्तीमूळे फिर्यादीमधील मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. फिर्यादीच्या वतीने सदर दुरुस्ती करण्याची परवानगी मागण्यात आली आहे.

२. आरोपीतर्फे सदर अर्जावर नि. ०९ वर म्हणणे दाखल करण्यात आले आहे. आरोपीच्या म्हणण्यानुसार फिर्यादी यांचा सदरचा अर्ज व त्यातील विधाने त्यांना मान्य व कबूल नाहीत. सदरचा अर्ज फिर्यादी यांनी कोणत्या कलमांतर्गत दाखल केला आहे हे नमूद नाही. तसेच सदरचा अर्ज दाखल करुन लॅक्युना भरुन काढणेचा प्रयत्न करत असल्यामुळे अशा प्रकारची दुरुस्ती मागता

येणार नाही. सदर दुरुस्ती अर्जामुळे संपूर्ण केसमध्ये बदल होणार आहे. त्यामुळे केसचे पूर्ण स्वरुप बदलणार आहे. त्यामुळे अर्ज चालण्यास पात्र नाही. यदाकदाचित सदरचा अर्ज अंतिम निर्णयापर्यंत आल्यास फिर्यादी यांना जास्तीत जास्त दंड करावा अशी विनंती त्याने केली आहे.

३. अभिलेखाची पाहणी केली. फिर्यादी व आरोपी तर्फे युक्तीवाद ऐकला.

४. सदरच्या प्रकरणाचे अवलोकन केले असता त्यातील दिलेला धनादेश दि. १८.१२.२०२४ रोजीचा, मेमो १९.१२.२०२४, आरोपीला नोटीस पाठवलेली तारीख ०८.०१.२०२५ बाबत अभिलेखावर कागदपत्रे हजर आहेत. प्रस्तूत अर्जाच्या अनुशंगाने विचार केला असता फेरीस्त नि. क्र. ३/६ ही आरोपीस नोटीस मिळालेची पोचपावती आहे. त्यावरील तारीख ०८.०१.२०२५ असल्याचे दिसून येत आहे.प्रस्तूत फिर्यादीमध्ये केवळ फिर्यादीस कारण या परिच्छेदामध्ये सदर तारीख ०८.०१.२०२५ ऐवजी ०८.०१.२०२४ अशी नमुद झाली आहे. संपूर्ण फिर्यादीमध्ये सदर तारीख ०८.०१.२०२५ अशीच नमुद आहे. सबब प्रथमदर्शनी अर्जातील कथनामध्ये तथ्य असल्याचे दिसते त्यामुळे सदरची दुरूस्ती मूळ अभिलेखास अनुसरुन आहे. सदरच्या प्रकरणामध्ये अद्याप पुरावा होणे बाकी असल्याने आरोपीस याबाबीवर उलटतपास घेण्याची संधी आहे. त्यामुळे अर्ज मंजूर केल्यास त्याचा कोणताही परिणाम आरोपीवर होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास फिर्याद तांत्रीक बाबींवर खारीज होवू शकते. सबब पुढील आदेश.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. फिर्यादीस, अर्जामध्ये मागितल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. फिर्यादीने त्या अनुषंगाने पुढील तारखेपुर्वी दुरुस्ती करुन, फिर्यादीची दुरुस्त प्रत दाखल करावी.

४. फिर्यादीने आरोपीस खर्चाची रक्कम म्हणून र.रु. ३००/– पुढील तारखेपर्यंत अदा करावे.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.01.09 17:37:14 +0530

**दिनांक: ०९.०१.२०२६** **( एम.ए.कुलकर्णी )**

**ठिकाण: कवठेमहांकाळ** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**कवठेमहांकाळ**

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 09.01.2025 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 09.01.2025 |
| Order /judgment uploaded on | : | 09.01.2025 |